# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८९ वा ❑ गुरूवार दि.१५ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## भारत-पाक तणावात चीनची मोठी खेळी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर, चीनने अलिकडेच अरुणाचल प्रदेशातील २२ ठिकाणांची नावे बदलली आहेत. भारताच्या सार्वभौमत्वाला आणि प्रादेशिक अखंडतेला आव्हान देणारे हे एक मोठे राजकीय पाऊल आहे.

यावर भारताने तीव्र प्रतिक्रिया देत म्हटले आहे की- अरुणाचल हा भारताचा अविभाज्य भाग आहे. चीनने हे पहिल्यांदाच असे केले नाही तर चीनने यापूर्वीही असेच काही केले आहे.

अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याच्या चीनच्या प्रयत्नांवर भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने चीनला चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारताने चीनच्या नापाक प्रयत्नांना पूर्णपणे नाकारले आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या मुद्द्यावर माध्यमांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. चीनला कडक संदेश देताना त्यांनी म्हटले की, चीनच्या अशा हास्यास्पद प्रयत्नांमुळे हे राज्य भारताचा अविभाज्य भाग होते, आहे आणि राहील हे निर्विवाद सत्य बदलणार नाही. अरुणाचल प्रदेशातील काही ठिकाणांची नावे चीनने जाहीर केल्यावर प्रतिक्रिया देताना भारताने ही टिप्पणी केली आहे. अरुणाचल प्रदेश हा तिबेटचा दक्षिण भाग असल्याचा चीनचा दावा आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, ‘‘भारतीय राज्यातील अरुणाचल प्रदेशमधील ठिकाणांचे नाव बदलण्याचे चीनचे व्यर्थ आणि हास्यास्पद प्रयत्न आम्ही लक्षात घेतले आहेत.‘‘

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने सांगितले की, ‘‘आमच्या तत्वनिष्ठ भूमिकेनुसार आम्ही अशा प्रयत्नांना स्पष्टपणे नकार देतो.‘‘ या मुद्द्यावर माध्यमांच्या प्रश्नाला उत्तर देताना जयस्वाल यांनी हे विधान केले. ते म्हणाले,‘‘ अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि नेहमीच राहील हे निर्विवाद वास्तव बदलणार नाही.‘‘

भारत आणि चीनमधील सीमेला प्रत्यक्ष नियंत्रण रेषा () म्हणतात. मॅकमोहन रेषा भारतातील अरुणाचल प्रदेश राज्याला तिबेटपासून वेगळे करते. प्रत्यक्षात, चीन ते मान्य करत नाही आणि वेळोवेळी अरुणाचल प्रदेशला दक्षिण तिबेटचा भाग म्हणून दावा करतो. त्याच वेळी, भारताने चीनचा हा दावा फेटाळत आहे.

एक प्रश्न असा उद्धवतो की चीन आपले नाव का बदलतो? यामागील कारण काय तरराजकीय दबाव निर्माण करणे,नकाशे आणि कागदपत्रांमध्ये गोंधळ निर्माण करणे,आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर खोटा दावा स्थापित करणे, आणि स्थानिक भाषा आणि संस्कृतीचे उच्चाटन करणे.मात्र भारताने चीनचा हा दावा अनेकदा फेटाळून लावला आहे.

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम अंतर्गत सीमावर्ती भागात वाहतूक आणि राहणीमान सुधारण्याशी संबंधित बरेच काम केले जात आहे. यामुळेच घाबरलेल्या चीनने ही युक्ती पुन्हा केली आहे. अरुणाचल प्रदेशातील भारत-चीन सीमेवरील मेचुका गावात अलीकडेच पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय साहसी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये अनेक देशांनी भाग घेतला होता.

याआधी एप्रिल महिन्यातही चीनने अरुणाचल प्रदेशातील ३० ठिकाणांची नावे बदलली होती. चीनने ज्या ३० ठिकाणांचे नाव बदलले त्यात १२ पर्वत, चार नद्या, एक तलाव, एक पर्वतीय खिंड, ११ निवासी क्षेत्रे आणि जमिनीचा एक तुकडा यांचा समावेश होता. चीनने ही नावे चिनी अक्षरांमध्ये लिहिली.

# सिमेंटच्या इमारती पाडून पुढील काळात शेती करावी लागेल-डॉ.गोपाल सहर शर्मा

**ज्योतिर्मय साहित्य**

**हातकणंगले** – कवि सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी व पसायदान प्रतिष्ठान गुहागर आयोजित २४ वे छत्रपती शंभुराजे समाजप्रबोधन मराठी ग्रामीण साहित्य संमेलन दिनांक ११मे २५ रोजी भारत को-ऑपरेटिव्ह सोसायटी गांधी मैदान जवळ कोल्हापूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले .

प्रा.शिवाजी शिंदे सचिव मराठी भाषा दक्षता अधिकारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर हे संमेलनाचे अध्यक्ष म्हणून लाभले होते प्रसिद्ध हिंदी साहित्यिक गोपाल सहर शर्मा गुजरात यांचे हस्ते संमेलनाचे उदघाटन झाले तर प्रतिमा पुजन डॉ. श्रीकांत पाटील कादंबरीकार घुणकी यांच्या हस्ते झाले त्यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.बाळासाहेब लबडे लेखक रत्नागिरी, शाहीर शाहिद खेरटकर चिपळूण, कवी दीपक पवार रुकडी, हे मान्यवर उपस्थित होते .

संमेलनाचे उद्घाटक प्रसिद्ध हिंदी साहित्यिक डॉ गोपाल सहर शर्मा म्हणाले की गाव म्हणजे आपल्या संस्कृतीची उगमभूमी आहे. औद्योगिकीकरणानंतर गावांमधून युवकांचे जो पलायन सुरू झाले ते अजूनही थांबलेले नाही. शहरांनी अनेक तरुणांना गिळंकृत केलं. आता सीमेंटच्या जंगलांनी शेतजमीन झाकली आहे. पण तो दिवस लांब नाही, जेव्हा या इमारती पाडून पुन्हा शेतं तयार करावी लागतील.शहरातही जमीन असते आणि गावातही. पण गावातील शेतकऱ्याचं नातं मातीशी असतं, तर शहरी बिल्डरचं नातं केवळ नफ्याशी. ग्रामीण साहित्य इत्रसुगंधाने नव्हे, तर मेहनतीच्या घामाच्या खाऱ्या वासाने भरलेले असते. प्रेमचंद म्हणतात ‘‘तुम्ही फावडे चालवता, मी लेखणी चालवतो पण मीही एक शेतकरी आहे !’’ सदर साहित्य संमेलनात कवि सरकार इंगळी यांचा कवी सरकारांच्या लावण्या हा लावणी संग्रह अशोक मोहिते बार्शी यांचा काव्य बहार काव्यसंग्रह प्रा. गोविंद लहाने परभणी यांचा काव्यरेखा काव्यसंग्रह ह.भ.प. विना उर्फ दिपाली महाडिक खेड यांच्या गंध तुझ्या आठवणींचा काव्यसंग्रह कु. कल्याणी भोसले कोरोची यांचा काव्य कल्याणी काव्यसंग्रह तसेच साहित्यिकाला संमेलन विशेषांकाचे प्रकाशन लेखक तानाजी आसबे वाळवे खुर्द आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, डॉ शिवाजी शिंदे डॉ श्रीकांत पाटील, तानाजी आसबे, शाहीर शाहिद खेरटकर, बाळासाहेब लबडे यांनी आपले मनोगत मांडताना साहित्य विषयी आपले मार्मिक विचार मांडून साहित्यिक यांना मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात परिसंवाद गावगाड्यातील माणसे आणि साहित्य या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. या परिसंवादाचे अध्यक्ष अध्यक्ष प्रा अमरनाथ कांबळे अतिग्रे साहित्यिक विचारवंत हे होते सौ सुष्मिता रेंदाळकर पुणे व कवी भाऊसो कांबळे ममदापूर व



दत्तात्रय भापकर मुंबई यांनी सहभागी घेतला त्यांनी ग्रामीण भागातील रुढी -परंपरा व गावगाडातील व्यक्ती चित्रण या विषयी आपले विचार मांडले. तिसऱ्या सत्रात कवी दीपक पवार रुकडी यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन पार पडले कवी संमेलन अध्यक्ष दिपक पवार रुकडी यांनी आपल्या मातीशी नाळ जोडली गेली पाहिजे असे सांगून संमेलतात ज्यांचे काव्य संग्रह प्रकाशित केले आहे. त्यांच्या पुस्तकाका विषयी माहिती करून दिले. सदर कवि संमेलनात महाराष्ट्रातील कोल्हापूर सांगली पुणे सातारा रत्नागिरी छ. संभाजीनगर धाराशिव, मुंबई, सोलापूर अनेक जिल्ह्यातून कवी कवयत्री यांनी सहभाग घेतला होता.

त्यानंतर विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना डॉ शिवाजी शिंदे अशोक भोईटे राजू पोतदार सह इतर प्रमुख पाहुणे यांचे हस्ते विविध पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

सुत्रसंचालन दिपक पवार सर रुकडी विद्या खामकर गारगोटी सुरेखा वाडकर इंचलकरंजी प्रा अमरना कांबळे यांनी केले.असे प्रसिद्धी पत्रक सरकार इंगळी यांनी दिले आहे .

# वारसा साहित्य मंचामार्फत पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – वारसा साहित्यमंचाद्वारे पहिले राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दिनांक २५ मे (रविवार) रोजी जिजाऊ मंदिर बाबा पेट्रोल पंपाजवळ, म्हाडा कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडणार आहे.

पहिले कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिका प्रिया धारूरकर असतील. या कार्यक्रमाचे उद्घाटन लातूर येथील ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध गझलकार, कवी, संपादक रज्जाकभाई शेख असतील. या कार्यक्रमासाठी नाशिक येथील सुप्रसिद्ध गझलकार, निवेदक बाळासाहेब गिरी, तसेच पुणे येथील काव्यवाणी काव्यसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा वाणी ताकवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कवी अर्जुन गायकवाड संपादित वारसा या प्रातिनिधिक काव्यसंग्रह तसेच कवी ज्ञानदेव डिघुळे लिखित आप्पा शब्दांचे दर्पण या कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. या दोन्ही काव्यसंग्रहाचे निर्मिती काव्यगंध प्रकाशनाने केलेली आहे. याप्रसंगी सर्वच कवींना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लातूर येथील





कवी प्रा.डॉ.सुशिल सातपुते करणार आहेत. वारसा साहित्य मंचामार्फत अनेक उपक्रम राबविले जातात तसेच विविध साहित्यिक स्पर्धेचे आयोजन केले जाते.

या कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी जास्तीत जास्त कवीने नोंदणी करावी व कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन वारसा साहित्य मंचाचे संस्थापक अध्यक्ष कवी अर्जुन गायकवाड, उपाध्यक्ष कवी पवन शेळके, सचिव कवी ज्ञानदेव डिघुळे, कवी प्रा. डॉ. सुशिल सातपुते यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कवी अर्जुन गायकवाड ( ७४९९७८८६२०) यांना संपर्क करावा.

# ११ वी ऑन लाईन प्रवेश प्रकिया, स्वा सावरकर उच्च माध्यमिक विद्यालयात मदत कक्ष स्थापन


**ज्योतिर्मय साहित्य**

बीड – शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ पासून इ ११वी ऑनलाईन प्रवेश प्रकिया सुरु करण्यात आली आहे इयत्ता १० वी उतीर्ण विद्यार्थाना इयत्ता ११वी विज्ञान, व कला वाणिज्य शाखेत प्रवेश घेणे साठी या वर्षी पासून ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे . विद्यार्थाना ऑनलाईन अर्ज भरणे सुलभ व्हावे यासाठी स्वा सावरकर उच्च माध्यमिक विद्यालय सराफा लाईन धोंडीपुरा, बीड येथे विद्यार्थी मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शाळेतील इयत्ता १० उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आमच्या उच्च माध्यमिक विद्यालयातून ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल . दि १५/ ५ / २०२५ पासून सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत ११वी वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थानी मदत कक्षाचा लाभ घ्यावा आमच्या. स्वा सावरकर उच्च माध्यमिक विद्यालय बीड यु डायस कोड २७२७१२००७०६ असा आहे प्रवेश नोंदणी करणेसाठी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य विठठल काळे उपमुख्याध्यापक माधव जोशी विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे प्रवेश कमिटी सदस्य यांनी केले आहे .



## लक्षवेधी छायाचित्र....



ये दोस्ती... हम नहीं तोडेंगे.... शोले च्या शूटिंग दरम्यान (१९७५) एक मस्त आनंदी क्षण.

(सोशल मीडियावरून साभार )




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com


## आनंदी पहाट...

# व्यक्तिमत्व विकासाची निरंतर प्रक्रिया

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रत्येक व्यक्ती जन्मतः वेगळी, विशेष असते. प्रत्येकाच्यात एक वेगळी खासियत असते; जिच्यामुळे आपण इतरांपेक्षा वेगळे असतो. हा वेगळेपणाच ठरवतो कि आपण कोण आहोत, कसे आहोत, एखाद्या परिस्थितीत आपण कसे वागतो ? गरज असते ती आपली अंतर्गत क्षमता जागवण्याची आणि व्यक्तिमत्व सुधारण्याची. व्यक्तिमत्व विकासामुळे आळस, अनुत्साह आणि निरसतेमध्ये अडकलेली व्यक्ती कार्यक्षम, उत्साही, प्रसन्न आणि आपल्या ध्येयानं प्रेरित होऊ लागते. व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेमध्ये व्यक्ती आपल्या वैशिष्ट्यांना कोणत्याही प्रतिकाराशिवाय, आपल्या सीमांच्या बंधनांचा त्याग करणे शिकत असते. आनंदी राहणे शिकत असताना सर्व काही अधिक उत्साहानं, चैतन्यानं करू लागत असल्याचं दिसून येतं. प्रत्येक व्यक्तीमध्ये अनेक गुण असतात; त्यातील काही गुण इतरांसारखे देखील असतात, तर काही गुण इतरांपेक्षा वेगळे, निराळे असतात. खरं तर ह्या वेगळ्या गुणांमुळेच ती व्यक्ती ओळखता येते. म्हणूनच, व्यक्तिमत्व म्हणजे व्यक्तीमधील वैविध्यपूर्ण गुणविशेषांचा वैशिष्ट्यपूर्णसंच होय. व्यक्तिमत्व विकास हि एक व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये, शारीरिक विकास, भावनिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक विकास, आत्मिक विकास अशा अनेक बाबींचा समावेश असल्याचं दिसून येत असतं. सध्याच्या २१ व्या शतकात व्यावसायिक क्षेत्रात आपली प्रतिष्ठा वाढवण्यासाठी फक्त उच्च शिक्षण असून चालत नाही; त्यासोबत आपल्यातील आत्मविश्वास सुद्धा महत्वाचा ठरत असतो. आपल्या व्यक्तिमत्वाचा किती प्रभाव पडतो, ह्यावर आपल्या कामाचा आलेख ठरविला जात असतो. आपण कोणत्याही व्यावसायिक क्षेत्रात काम करत असताना आपल्या वक्तृत्वाचा खूप मोठा प्रभाव पडत असतो. आपण आपले विचार, विषय किती तार्किक पद्धतीने, अगदी सोप्या भाषेत, सोयीस्कररित्या, न अडखळता, धीटपणाने आणि समोरच्या व्यक्तीला पटतील असे मांडू शकल्यास आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव निश्चितच समोरच्या व्यक्तीवर पडतो.

# मानवी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम




**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्याला वनवासात जावे लागणार आहे हे कळल्यावर क्षणभर त्यांच्या चेहरा विषादयुक्त होतो. पण ते रागाने आरडाओरड वा आक्रस्ताळेपणा करीत नाहीत. त्या विपरीत परिस्थितीही मनावर नियंत्रण मिळवतात.

त्यांनी महापराक्रमी, बलाढ्य अशा रावणावर विजय मिळवला यापेक्षाही आपल्या कर्तव्यपूर्तीसाठी आपल्या भावनांवर विजय मिळवणे हीच खरी रामायणातील शौर्यकथा आहे असे यानिमित्ताने म्हणावेसे वाटते. म्हणूनच मानवी देहातील तेज म्हणजे श्रीराम !श्रीरामांनी कुठेही स्वैराचार वा अविचार केला नाही. मर्यादांचा खरा अर्थ श्रीरामांनी आपल्याला शिकवला आहे. मर्यादा पाळणे म्हणजे दुबळेपणा नव्हे. आजच्या काळात, जिथे संयम हा कमकुवतपणा समजला जातो आणि आत्मसंयम हा अडसर मानला जातो, तिथे श्रीरामांनी घालून दिलेला मर्यादा पुरुषोत्तमाच्या आदर्शाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.




श्रीरामांनी रावणाचा पराभव केला, युद्ध जिंकले म्हणून केवळ ते मोठे ठरत नाहीत तर त्यांचा स्वतःवरील विजय, आत्मसंयम किंवा आत्मनियंत्रणांमुळे ते महान ठरतात असे मला वाटते.

ते एक आदर्श मित्र झाले. जातीपातीच्या मर्यादा ओलांडून त्यांनी सर्वांना आपले मित्र म्हणून हृदयाशी धरले. त्यांना कधीच अंतर दिले नाही. त्यांच्या सर्वसमावेशक दृष्टीचे ते उदाहरण आहे. आदर्श पुत्र, आदर्श पिता, आदर्श पती, आदर्श राजा म्हणून घालून दिलेल्या त्यांच्या उदाहरणाचा आणि आदर्शांचा सर्वकाळी एक अनुकरणीय उदाहरण म्हणून विचार करावा असेच ते आहे. ते एक आदर्श शत्रू देखील ठरतात. मरणानंतर वैर संपते म्हणून रावणाचा विधिपूर्वक अंत्यसंस्कार करण्यास त्यांनी बिभीषणाला सांगितले. रावणाच्या मृत्यूपूर्वी लक्ष्मणाला त्याचा उपदेश घेण्यासाठी पाठवले.

श्रीरामांना देव म्हणून मानणं सहज आहे. पण त्यांच्यासारखं माणूस होणं ही खरी साधना आहे. कारण ते आदर्श आहेत जे उंच आकाशात नाहीत, तर आपल्या प्रत्येक कृतीत उतरवता येतील असे. त्यांचं जीवन सांगतं की संकटं तर येतीलच, पण संयम हरवू नका. कोणत्याही परिस्थितीत आपलं कर्तव्य, आपला धर्म सोडू नका.

ते सांगतात की भावना असाव्यात, पण त्यावर विवेकाचं वर्चस्व असावं. आयुष्यात अनेक मोहाचे, लोभाचे क्षण येतील, पण तुम्ही विचलित होऊ नका. आपला ध्येयतारा सदैव डोळ्यासमोर असेल तर माणूस विचलित होत नाही. तो कर्तव्यपथावर वाटचाल करीत राहतो. विमोह त्यागून कर्मफलाचा सिद्ध होई पार्था कर्तव्याने घडतो माणूस जाणून पुरुषार्था . हीच शिकवण आपल्याला राम आणि कृष्णाचं जीवन देतं.



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


# मृत्यूनिरूपण

**ज्योतिर्मय साहित्य**

५९ ओव्या मध्ये समर्थांनी, या निरूपणाची ओळख करून दिली आहे. जसे ज्याचे कर्म असेल तशाच स्वरूपात त्याला अक्षरशः क्षणोक्षणी सामोरं जावं लागेल. मरण आजची घटना ऊद्या वर ढकलू असं होऊ शकत नाही.

१. मरण हे कुणालाही चुकलं नाही. फक्त ते मागेपुढे येते. अंतकाळी कोणी मोठा आहे शुर आहे लढ्वया आहे, बलाढ्य आहे धनाढ्य आहे, प्रतापी आहे, भूपती आहे, चक्रपती आहे, झुंजार आहे. रागीट आहे, विख्यात विद्वान आहे, सर्वगुण संपन्न आहे. त्याला मी कसा नेऊ. असा विचार यमराज कधीच करत बसत नाही। अंतकाळ ही जबरदस्त वाईट वेळ आहे. जो जीव जन्माला आला तो एक दिवस मरणारचं आणि हे अंतिम सत्य आहे त्यासाठी निरोगी जाणीव ठेऊन आपले जीवन सार्थकी करून घ्यावे. वैभवसंपन्न माणूस, अगाध बुध्दीची प्रतिभा असलेला, प्रचंड पुरूषार्थ गाजवलेला, सगळे मरण पावलेले आहेत. मरणाने देह जरी नेला तरीही आपल्या कर्माने सदाचाराने वागून किर्ती रूपाने ऊरावे. ४५ ओव्याच्या पुढे तर समर्थ म्हणतात की जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रचंड नाव कमावलेले गेले. ज्यांनी जगामध्ये ऊलथापालथ केली ते देखील मरणाला शरणं गेले. बळाचा वापर करणारे,भरपूर आयुष्य जगलेला, सगळ्यांना पोसणारे, धर्मरक्षण करणारे, हे आणि असे अनेक लोक गेले. प्रचंड बुद्धीवान गेले, अचाट वादविवाद करणारे, तापसी लोकांचे समुह गेले. विद्वान ब्राम्हणांचे समूह गेले. अनेक अनेक पिढ्या नाहीशा झाल्या पण संत महात्मेचे २. विचार मात्र अमर राहिले.

३. मित्रांनो या निरूपणाचा विचार केला तर एक लक्षात येते जीव जन्माला आला तो जगला ४. माझे माझे करून मरण्यापेक्षा सत्कर्म करत जगावे व सत्कर्म करूनच मरावे.५. श्री राम जय राम जय जय राम ६. जय जय रघूवीर सयर्थ।।



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# नाम व विकल्प !

**ज्योतिर्मय साहित्य**

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून विकल्पांच्या उच्चाटनाची गुरूकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरूवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले नाम चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तर नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.



## आरोग्य संजीवनी

# स्वस्त पण बहुगुणी तुरटी

**ज्योतिर्मय साहित्य**

खनिज घनता सुधारते

काळ्या उडीद डाळीमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम, लोह आणि कॅल्शियम इत्यादी आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे असतात. हे सर्व पोषक आपल्या हाडांमधील खनिज घनता वाढवण्यास मदत करतात. हे खूप महत्वाचे आहे कारण जसजसे आपण वय वाढतो तसतशी आपली हाडे कमकुवत होत जातात. त्यामुळे आपण ऑस्टिओपोरोसिससारख्या हाडांशी संबंधित आजारांना बळी पडतो.

मधुमेहामध्ये फायदेशीर राहते

जर तुम्हाला मधुमेह असेल तर तुमच्या आहारात उडीद डाळ ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते, त्यामुळे ते इंसुलिन सोडण्याचे नियमन करून तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करते.

हृदय निरोगी ठेवते

काळी उडीद डाळ तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी देखील उत्तम आहे कारण त्यात फायबर, मॅग्नेशियम आणि पोटॅशियम जास्त प्रमाणात असते, त्यामुळे ते तुमच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी प्रणालीला निरोगी ठेवण्यास मदत करू शकते. हे तुमच्या कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित करते, जे तुमच्या हृदयासाठी उत्तम आहे.

साखरे ऐवजी गुळ का खावा?

फुफ्फुसातील संसर्ग रोखतो – गुळामुळे रक्त शुद्ध होत. चयापचयाचा वेगही नियंत्रित राहतो. याशिवाय घसा आणि फुफ्फुसाच्या संसर्गावरही गूळ फायदेशीर ठरतो.

पोटाच्या तक्रारींवर गुणकारी– पोटाच्या विविध तक्रारींवरही गूळ हा रामबाण उपाय आहे. गॅसेस, असिडीटीची तक्रार असेल तर, गूळ खाण्याने त्रास कमी होतो. आंबट ढेकरींपासून सुटका – गूळ, सैंधव आणि काळे मीठ एकत्र करून खाल्लं तर आंबट ढेकर येणं थांबते.

सांधे दुखत असतील तर गूळ आणि आलं एकत्र करून खाल्ल्यास फायदा होतो. दररोज आलं आणि गुळाचा एक खडा खाल्ल्यास सांधेदुखीला आराम पडतो.

गूळ खाण्यानं शरीराला ऊर्जा मिळते. थकवा दूर होतो. थकवा, कमजोरी जाणवत असेल तर जरूर गूळ खावा.


संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

रक्ताची कमतरता भरून निघते – गूळ हा लोहाचा मोठा स्रोत आहे. तुमचं हिमोग्लोबिन कमी झाले असेल तर रोज गूळ खाण्यानं तात्काळ फायदा होतो. गूळ खाण्यानं शरीरातील लाल पेशींची संख्या वाढते. त्यामुळे गर्भवती महिलांना डॉक्टर गूळ खाण्याचा सल्ला देतात. रक्तदाब नियंत्रणात राहतो – गुळामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. विशेषतः उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या लोकांना गूळ खाण्याचा सल्ला दिला जातो. हाडं मजबूत होतात – गुळात कॅल्शियम आणि फॉस्फरस यांचं प्रमाण अधिक असतं. हाडांना बळकट करण्यात हे दोन्ही घटक महत्त्वाचे असतात. त्यामुळे गूळ खाण्यानं हाडांसाठीही लाभदायी ठरते. शरीर कार्यक्षम राहतं गुळामुळे शरीर मजबूत आणि कार्यक्षम राहते. शरीर ताकदवान बनवण्यासाठी दुधात गूळ घालून घेणे उपयुक्त ठरते. दुध आवडत नसल्यास एक कप पाण्यात पाच ग्रॅम गूळ, थोडासा लिंबू रस आणि काळे मीठ घालून प्यायल्यास थकवा दूर होईल. सर्दीवरही गुणकारी सर्दी–पडसं दूर करण्यासाठीही गूळ लाभदायी ठरतो. काळीमिरी आलं आणि गूळ मिसळून खाल्ल्यास सर्दी–पडसं कमी होतं. खोकला येत असेल तर साखरेऐवजी गूळ खाणं लाभकारक ठरतं. आल्याबरोबर गूळ गरम करून खाल्ल्यास घशातील खवखव, जळजळ दूर होते. डोळ्यांसाठीही लाभदायी – गूळ खाल्ल्यानं डोळ्यांची क्षीणता कमी होते. दृष्टी सुधारण्यासही मदत होते.




# संत जनाबाई

**ज्योतिर्मय साहित्य**



हा प्रत्याहाराचा अर्धा तुटलेला कडा निसरडा असल्यामुळे त्यावर बुद्धीचे ही पाय टिकत नाहीत. अष्टांग हाटयोग्या नाही प्रत्याहार साधत नाही. निराश होऊन ते साधन सोडतात. म्हणून मग

प्रत्याहाराचा अधाडा / जो बुद्धीचीयाही पाया निसरडा/ जेथ हटिये सांडती होडा/ कडेलग भये// ६/५६

अभावयोग विज्ञानी आणि मानवी बुद्धीने फार तर प्रत्याहारा पर्यंत चढ चढता येतो. येथे प्रवृत्ती धर्म संपतो. दैवी बळ, चांगदेव ,नामदेव यांच्यासारखे असले तरी थिटे अपुरे पडते. चांगदेव हे असे स्वतःहून निश्चयपूर्वक प्रयत्न करून अष्टांग योग साधना करणारे अभावयोगी होते. अशा प्रयत्नपूर्वक योग करणाऱ्यास अभावयोगी म्हणतात.

अयोगी :–अयोगी म्हणजे प्रयत्न पूर्वक ही नाही व अनायासे गुरुकृपें मुळेही नाही अशा कोणत्याच पद्धतीने योगाशी तीळ मात्र संबंध नाही ,असे सर्वसामान्य लोक हे अयोगी म्हणून ओळखले जातात.

आठ दहा वर्षाची चिमुरडी मुक्ताई ही चांग देवाला कोराच्या कोराच राहिला असे का म्हणाली असेल? हे आता आपल्या ध्यानी येते. ज्ञानेश्वर निवृत्ती सोपान मुक्ताबाई ही चारही भावंडे योगी होती ,तर चांगदेव हे अभावयोगी होते. अशा अभाव योग्याला योग मार्गात आणून पुढील दैवी संपदा हस्तांतरित करण्यासाठी चित्कला भगवती स्वरूपा मुक्ताई हिने त्यांचे गुरूपद स्वीकारले व चांगदेवास पूर्णत्वास नेले.

आता आपण चांगदेव महाराजांचा वरील अभंग याचे अवलोकन करूयात.

गुणातीत डहाळी पाळणा लाविला /तेथे सूत पहुडला मुक्ताईचा/

चांग देवाचे वय हे चौदाशे किंवा ४० कितीही असू द्या, पण ते दहा वर्षाच्या मुक्ताईस आपले सिद्ध सद्गुरु माणीत आणि या सद्गुरूंच्या म्हणजेच मुक्ताबाईचे मी तान्हे बाळ आहे हा भाव त्यांच्या या अभंगातून प्रथम स्पष्ट दिसतो. जेव्हा एखादे बालक तान्हे असते त्यावेळेस त्याच्या संगोपनाची सुरक्षिततेची आणि पालनपोषणाची सर्वथैव जबाबदारी त्याच्या आईची असते. चांगदेव हे साधन मार्गातील आता एक तान्हे बालक आहेत. पूर्ण समर्पण भावाने ते मुक्ताई यांच्यावर साधनेसाठी अवलंबून आहेत. संपूर्ण शरणागतीचा भाव व उत्कट प्रेम असल्याशिवाय गुरु प्रसन्नही होत नाहीत, आणि शिष्याच्या काही पदरात पडतही नाही. हा गुरू शिष्यातील प्रेम भाव जेवढा कोमल तेवढा त्याचा सद्गुरु कडून कृपा मिळविण्याचा अधिकार मोठा असे असते.

**(क्रमशः)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु**
**लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।**
**अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा**
**न्याय्यात् पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ।।**

अर्थ – नीतीचे जाणकार लोक निंदा करोत अथवा स्तुती करोत, लक्ष्मी तिच्या इच्छेनुसार येवो अथवा जावो, मृत्यु आज होवो अथवा युगांतरी होवो, धीरोदात्त लोक आपल्या न्याय्यमार्गापासून एक पाऊल देखील विचलित होत नहीत.

न्याय्यमार्गावर अढळ राहण्याविषयी येथे सांगण्यात आले आहे. जर आपला मार्ग न्याय्य असेल, तर लोकापवाद इ. भय किंवा आर्थिक द्वंद्व अशा कोणत्याही कारणाने आपण तो मार्ग नीतिज्ञ लोक सोडत नाहीत, असे प्रतिपादन भर्तृहरींनी केले आहे.






**ज्योतिर्मय साहित्य**

लहान मुलाला कोणी किंमत देत नाही .घरामध्ये काही विचार विमर्श होत असेल तर लहान मुलाला कोणी त्याचं मत काय आहे हे विचारच नाही. बाल्यावस्था म्हणजे अज्ञान आहे.आणि अज्ञान आणि कुणाला सुख दिलं नाही तारुण्यामध्ये फक्त विषय भोगाची लालसा आहे. आणि विषय भोगांनी तृप्त झालेला एकही मनुष्य आतापर्यंत मी पाहिला नाही. तारुण्य म्हणजे फक्त उत्साह आहे भोगाची लालसा आहे. वेगवेगळ्या विषयांकडेची प्रवृत्ती आहे .विषय भिन्न भिन्न रूप घेऊन येतात त्या त्या रूपाला आकर्षित होणं, भुलणं तारुण्याचा स्वभाव आहे. समाधान नाही. प्रौढावस्थेमध्ये चिंता आहे .माझं कसं होईल ?माझ्या कुटुंबाचं कसं होईल? मरण कधी येईल? वृद्धावस्थेमध्ये की परावलंबित्व सारखं दुसरं दुःख माणसाला नाही कधी समाधानाचे दिवस आहेत मला सांगा ?हे सगळं सांगितल्यानंतर रामचंद्र प्रभुंना वसिष्ठांनी उपदेश केलाय .तोउपदेश करताना योग या शब्दाचा धातूवरून योग शब्द जोडणे या अर्थाने योग हा शब्द वापरला जातो .पण स्वतः योगवासिष्ठ योग शब्दाची व्याख्या सांगताना असं सांगताकी संसारातून तरुन जाण्याची युक्ती म्हणजे योग आहे. या संसारातून आम्ही तरुन कसं जायचं या संसार सागारातून बाहेर तर पडलं पाहिजे इथे गटांगळ्या खाण्यामध्ये काही तात्पर्य नाही. अशा या बाहेर पडायचंय कसे? संसारातून तरुण जाण्याची युक्ती म्हणजे योग.शब्द वेगवेगळे अर्थाने वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यातून वेगवेगळ्या ठिकाणी वापरला जातो. पण जोडणे हा अर्थ त्याला सगळीकडे समान आहे. रामचंद्र प्रभूंना त्यांनी सांगितलं ,बाबा हे सगळे विचार तू बोलून दाखवतोयस याचा अर्थ तुझी बुद्धी प्रगल्भ आहे. तू मोठा झाला आहेस. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

या सुरुवातीच्या नाटकांमधून एक नाटककार म्हणून रवींद्रनाथ घडत होते. नाटकाच्या पारंपरिक कल्पना आणि मर्यादा रवींद्रनाथांमधला कवी फारसा मानत नव्हता. तर आपल्याला हवे तसे रंगरूप या नाटकांना ते देत होते. हेच नाटककार म्हणून रवींद्रनाथांचे श्रेष्ठत्व आहे. नाटके पाहणाऱ्या प्रेक्षकांनी नाट्यरसिक होण्यापेक्षाही काव्यरसिक होऊन या नाटकांचा आनंद घ्यायला हवा. मायार खेला हेही संगीत नाटकच आहे. या नाटकात रवींद्रनाथांनी इटालियन ऑपेरा आणि आयरिश संगीताचा सुरेख संगम साधला आहे. या नाटकात अमर, प्रमदा आणि शांता अशी तीन पात्रे आहेत. शांताने आपले हृदय आधीच अमरला अर्पण केले आहे परंतु त्याला तिचे आकर्षण नाही. तो एका वेगळ्या अशा आदर्श जीवनसाथीच्या शोधामध्ये असतो. अशावेळी त्याची भेट प्रमदाशी होते. पण प्रमदा हिच्या मनात अमरविषयी खरे प्रेम नाही. ती तिच्या सौंदर्याने अमरला मोहित करण्याचा प्रयत्न करते. एक प्रकारे हा मायार खेला म्हणजे भ्रम आहे. शेवटी अमरला प्रमदाच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव होते आणि शांताचे महत्व त्याला कळते. तो पुन्हा शांताकडे परत येतो अशी ही कथा आहे. शांता ही खऱ्या प्रेमाचे आणि त्यागाचे प्रतीक आहे.

वाल्मिकी प्रतिभा, कालमृगया, प्रकृतीर प्रतिशोध, मायार खेला या संगीत नाटकानंतर रवींद्रनाथांचा विविध विषयांवर आणि विविध सामाजिक प्रश्न घेऊन नाटके लिहिण्याचा आणि दिग्दर्शित करण्याचा प्रयत्न सातत्याने सुरूच होता. इंग्रज राजवटीने भारतीय कला आणि संस्कृती यांच्यावर आक्रमण केले होते. भारतीय कलांचा ऱ्हास होत होता. गौरवशाली असलेली भारतीय नाट्यपरंपरा लयास चालली होती. रवींद्रनाथांच्या नाटकांमुळे या नाट्यपरंपरेला संजीवनी मिळाली. तिचे पुनरुज्जीवन झाले.

१८८७ मध्ये त्यांनी राजर्षी ही लघु कादंबरी लिहिली. पुढे त्या कादंबरीचे नाट्यरूपांतर करावे असे त्यांना वाटले आणि मग १८९० मध्ये त्यांनी विसर्जन या नावाने ते प्रसिद्ध केले. रवींद्रनाथांसारख्या प्रतिभाशाली साहित्यिकाला एखादी छोटीशी घटना देखील एखादा कथा विषय देऊन जाते. या नाटकाच्या संदर्भात अशीच गोष्ट घडली. योगी अरविंद यांचे आजोबा (आईचे वडील) राजनारायण बोस यांना ते एकदा भेटायला गेले होते. त्यांचा प्रवास आगगाडीने झाला. येताना या आगगाडीच्या प्रवासात त्यांना थोडी झोप लागली आणि एक स्वप्न पडले आणि या स्वप्नातूनच या कादंबरीचे आणि नाटकाचे कथानक त्यांना मिळाले. हे नाटक कट्टर धार्मिक रुढी आणि परंपरा यांचे आंधळेपणाने केलेले पालन आणि आधुनिकता यांच्या संघर्षावर प्रकाश टाकते. माणसाच्या प्रगतीत रुढी परंपरांचे अंधपणाने केलेले पालन कसा अडथळा ठरते त्याचे चित्रण हे नाटक करते.

# निखळपणानं हसा

**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळच्या सत्रामध्ये अनेक जागेवर जेष्ठ नागरिकांचे किंवा बागबगीचांमध्ये फिरायला येणाऱ्या कांही लोकांचे ग्रुप एकत्र येऊन योग प्राणायम करतात. त्या योग प्राणायमाचाच एक भाग हास्य योग असतो. हसण्यामुळे शरीरावरील तणाव व नैराश्य कमी होते, आयुष्य वाढते, रक्तदाब कमी होतो, रोगप्रतिकार शक्ती वाढते, मुड चांगला होतो, सकारात्मक विचारात वाढ होते, खोटे खोटे हसले तरी मेंदुवर त्याचा सखोल परिणाम होतो. सकाळी बागबगीच्यांमध्ये योगा क्लबमध्ये जेंव्हा हास्ययोग केला जातो तेंव्हा हसू मनातून जरी नाही आले तरी हसण्याचा प्रयत्न केला जातो, तो करताना एकमेकांच्या हसण्याच्या गंमती जंमती पाहून खरेखरेच हसु फुटते. त्या योगा क्लबपेक्षा थोडया अंतरावरुन पाहणारी लोक असतात ती मात्र अगदी मनातून हसतात. एवढेच काय लगतच्या कॉलनीमध्ये घरांघरांमध्ये ते हास्य इतरांना हसवून जाते. या हसण्यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम दाखविले जातात. अलिकडेच आमचे एक नातेवाईक कर्करोगाच्या आजाराने गेले. परंतु त्यांच्या जीवनाच्या शेवटच्या कांही दिवसामध्ये त्यांच्या चेहऱ्यावर ''चला हवा येऊ द्या '' या कार्यक्रमामुळे हास्य येत असे, ते पाहून ते आनंदी होत असत. त्यामुळे हास्य हे आयुष्यवाढीचे गुपीत आहे. राजेश खन्नावर चित्रीत केलेल्या आनंद चित्रपटामध्ये गंभीर आजार माहिती असताना, आयुष्याची कांही दिवस बाकी आहेत असे माहित असताना सुध्दा एका गंभीर आणि भावनास्पर्षी क्षणासह आनंदाने जगण्याचा मंत्र चित्रपटाने दिला आहे.

सुफी रचनांमध्ये, संतवाणीमध्ये, विराण गीतांमध्ये हे शरीर किरायाचे घर आहे असे वर्णन असतात. थोडक्यात हे जीवन म्हणजे एक लिज आहे. त्यास एक ठराविक कालावधी आहे. त्या लिजच्या अटीशर्तींचं उल्लंघन झालं तर देव कुठे विचारायला येऊ लागलाय. तो चा खर्च आकारत नाही, वाढीव बांधकामाचा प्रिमीयम मागत नाही, आयुष्याची कांही वर्ष वाढली तर कुठे



अतिरिक्त प्रिमीयम घेतो, करारनाम्याचा भंग झाला म्हणून त्यांनी कधी नोटीस दिली नाही, कधी एकत्रीकरणावर आक्षेप घेतला नाही किंवा पोट भाडेकरु ठेवले म्हणून कधी जाब विचारायला आला नाही. त्यांनी मुक्त असे जीवन दिले आहे परंतु ज्या कांही मर्यादा आहेत, जी कांही बंधने आहेत, जी कांही सामाजिक चौकट आहे ती समाजाने आपल्या सोयीसाठी, सामाजिक शिस्तीसाठी केलेली आहे.

चालता बोलता छोटया छोटया

**माधव सूर्यवंशी, माकणीकर**

विनोदातून हास्य निर्माण करणे आणि त्या हसण्याचा आनंद घेणे ही दैनंदिनी पाळली पाहीजे. सकाळी सकाळी ऑफीसमध्ये एकदम कांही लुटपाट झाल्यासारखं गंभीर मुद्रेने बसले की पाहणाऱ्या प्रत्येकांना दिवसभराचा प्रश्न पडतो यांस नक्की काय झालं असेल, त्यामुळे त्यांचाही दिवस विचारचक्रामध्ये जातो. त्यामुळे सकाळीच हास्यमुद्रेने आले तर एकमेकांचा दिवस आनंदाचा जातो. माणसांच्या मनाच्या वेध घेऊन चार्ली चॅम्प्लीन यांनी एकेकाळी प्रचंड हसविले, टॉम ॲण्ड जेरी सारख्या मालिका आजही आनंद देऊन जातात.

माणूस जेंव्हा जन्माला आला त्यावेळी त्यांनी सोबत सुख, दुख, दया, कपट, राग, द्वेश, तिरस्कार, लोभ, लबाडी, मोह, प्रेम, आनंद, मत्सर असे अनेक गुण घेऊन जन्माला आला. हे सर्व अस्त्र आणि शस्त्र सर्वांकडेच आहेत परंतु त्यातील कोणते वापरायचे हे प्रत्येकांनी ठरवायचे आहे. आपल्या हसण्यामुळे कुणाला काय वाटेल याची चिंता का करायची. वाटेल तिथं इतरांची मन दुखवू नये यांची काळजी घेऊन हसून घ्यायचं.

माणसाचा स्वभाव आहे कुणी पाय घसरुन पडले की त्यांच्यावर दया येण्यापेक्षा आणि त्यांना सहाय्य करण्यापेक्षा त्याचे हसू येते. एवढेच काय त्या घटनेची आठवण काढून नंतर पुन्हा पुन्हा अनेक वेळा मनालाच हसु येतं. समाजात एखादयाचं नुकसान झालं, एखादयाचा अपमान झाला तरी हसलं जातं. त्यामुळे ''हसु होईलं असं कांही करु नये'' अशी म्हणच आहे. किंवा एखादी गोष्ट क्षुल्लक समजून हासून वेळ मारली तर म्हणतात ''हसण्यावर नेऊ नका''. हास्य बिभत्स असतं, कुत्सीत असतं, विकट असतं, हास्य इतरांची टिंगल करणारं नसावं, इतरांच्या भावना दुखावणारं नसावं, कुणाच्या कमजोरीवर नसावं, हास्य आनंदी असावं, हास्य मनातून आलेलं असावं, हास्य इतरांना प्रेरणा देणारं असावं, महाभारतामध्ये इंद्रप्रस्त महालामध्ये दुर्योधन जेंव्हा एका मायावी कुंडामध्ये पाणी समजून पडला त्यावेळी द्रोपदीने दुर्योधनाला आंधळयाची मुलं आंधळीच असे म्हणून हसली होती त्यामुळे ''महाभारत'' घडलं. त्यामुळे असंही हसु नये जेणेकरुन कांही ''महाभारत'' घडेल. मोहम्मद रफीचे एक गीत आहे, अंधारातील तारे तुम्ही अंधारावर रुसा, हसा मुलांनो हसा. मुले म्हणजे निखळ हास्याची संपत्ती असतात. त्यांच्या हसण्यामागे मुखवटे नसतात. कांही गोष्टीने त्यांना आणखी शिवलेले नसते. त्यामुळे मुलांचे हास्य निखळ असते. तसेच निखळ हास्य जपा परंतु निखळ आणि आनंदी हसा.

**(फोटो – गूगलच्या माध्यमातून साभार)**

## दहावी परिक्षेत आदीराज शेळके याचे दैदिप्यमान यश

**ज्योतिर्मय साहित्य**



**जालना** – येथील आदीराज दीपक शेळके यांनी इयत्ता दहावीच्या परिक्षेत ९४.४० टक्के गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे.

आदीराज शेळके हा बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथील चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी आहे. इयत्ता सातवी पर्यंतचे त्याचे शिक्षण हे जालना येथील श्री. म. स्था. जैन विद्यालयात झाले आहे. आदीराज त्याच्या यशाचे श्रेय हे त्याचे आत्येमामा रविंद्र वायाळ, आत्या रेणुका वायाळ (शेळके), आजी विमलबाई शेळके व त्याच्या चैतन्य गुरुकुल येथील शिक्षकांना देतो. दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके यांचा तो मुलगा आहे.

आदीराज यास गणितात ९८, इंग्रजीत ९६, विज्ञान ९४, हिंदी ८८, मराठी ९४ सोशल सायन्स या विषयात ९० गुण मिळाले असून एकूण ५०० पैकी ४७२ गुण मिळवून त्यांने ९४.४० टक्केवारी मिळविली आहे. चैतन्य गुरुकुल व ज्युनियर कॉलेजमध्ये म्हणजेच शाळेतून तो पाचवा आला आहे.

त्याच्या या यशाबद्दल त्याचे चैतन्य गुरुकुलचे संस्थाचालक आशुतोष चौधरी, राजेश ठेंग, मधुकर अंभोरे, शिवकुमार नागपुरे, हर्षवर्धन सावळे, लक्ष्मण परिहार, सौ. शारदा जोशी, जय मुळावकर आदी शिक्षकगण तसेच दीपक शेळके, रविंद्र वायाळ, रेणुका वायाळ, वर्षा शेळके, भारत बोराडे, उदयराज शेळके, रेखा जाधव, दिलीप कळणे, चंदा केंधळे, साक्षी भुतेकर, भगवान जाधव, निलावती बोराडे, उद्धव केंधळे, सुधाकर खरात, केदार गोरे, आनंद जाधव, शितल केंधळे, दिंगबर मानवतकर, प्रविण गोरे, शितल मानवतकर, सोनाली गोरे, मीना काळे–आगळे, कमलताई तुल्ले, माऊली कळणे, अंकीता बोराडे, संदीप भाकरे यांच्यासह मित्र परिवारातून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ग्रामीण भागातून तेजस्वी भरारी स्नेहा रत्नपारखी हिचा दहावीत ९२.८०% गुणांसह उल्लेखनीय यश


**ज्योतिर्मय साहित्य**



**बंगाली पिंपळा, ता. गेवराई (जि. बीड)** – जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेल्या स्नेहा अनिल रत्नपारखी हिने दहावीच्या परीक्षेत कोणत्याही खासगी क्लासशिवाय ९२.८० टक्के गुण मिळवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

स्नेहाने पहिलीपासून जिल्हा परिषद शाळेतच शिक्षण घेतले असून, प्रत्येक वर्षी ग्रेडसह उज्वल प्रगती नोंदवली आहे. दहावीच्या परीक्षेतही तिने अपार मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन या जोरावर यश संपादन केले आहे.

खास बाब म्हणजे स्नेहाने कोणताही क्लास न लावता शाळेतील शिक्षणावर पूर्ण विश्वास ठेवून हे यश मिळवले आहे. आज जिथे अनेक विद्यार्थी खासगी क्लासेसवर अवलंबून असतात, तिथे स्नेहाचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. स्नेहाच्या या घवघवीत यशामुळे तिच्या पालकांसह शाळेतील शिक्षक, गावकरी आणि परिसरातील नागरिक अत्यंत आनंदित असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. ''मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर काहीही शक्य आहे,'' हे स्नेहाने दाखवून दिले आहे.





अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

# आनंदाची लेणी

## आनंदपूर्तीचे क्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

रसिक हो नमस्कार

आपल्या धावपळीच्या दिवसात, घाई–गडबडीच्या व्यापात निवांत क्षण वाट्याला येतात तेंव्हा मनाला विश्रांतीचे क्षण नवी उभारी देतात. आठवड्याचे दिवस कामाच्या गर्दीत कसे जातात यावर विचार करण्यास वेळ मिळू न शकणाऱ्या आजच्या बिझी पिढीला आवश्यकता आहे ती, या थकवणाऱ्या टाईम–टेबल मधून जमेल तशी, जमली तितकी सुटका करून घेण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे, तरच आनंदाचा शिडकावा मनावर होईल.

आपण सामन्य माणसे, घर, परिवार, नात्यांच्या गोतावळ्यात रमणारी आहोत, त्यामुळे परिवाराच्या आनंदात सहभागी होणे'', हा आपला आनंद असतो.

मोठे परिवार, खुप नातेवाईक, असे पारंपरिक चित्र आज खूप छोटे झाले असले तरी, छोट्या परिवारात देखील खूप मोठा आनंद आहे, हे शोधून त्यात स्वतःला गुंतवून घेणाऱ्या प्रत्येकाला आनंद तर मिळेलच, त्याबरोबर मोठे मानसिक समाधान मिळवता येते.

आजच्या वातावरणात तणावग्रस्त असणाऱ्या आपल्या मनाला दिलासा देता येतो, काही वेळासाठी मन मोकळे करता येते'', हा आनंद अनुभवण्यास शिकावे ''हा सल्ला मी वडीलकीच्या नात्याने आणि आपलेपणाच्या हक्काने देतो आहे.

यासाठी तुम्हाला ''मला वेळच नाही, वर्क लोड आहे,

वर्क टेन्शन आहे'', या अवडंबरातून बाहेर पडावे लागेल.

रोजच्या ऑफिस रुटीन मधून नॉर्मल होणार आजच्या पिढीला सहजशक्य नाहीये'', याची कल्पना असून देखील

मी हे तुम्हास करण्यास सांगतो आहे'',

याचे कारण, या जंजाळात अडकून न पडता '', ऑफिस फर्स्ट'' '' हेही सोडू नका, पण फॅमिली सेकंड पोजिशनला असू द्या''. परिवारात घडणाऱ्या गोष्टीच्या सेलिब्रेशन करण्यासाठी पुढाकार घ्या, सर्व वयोगटातील फॅमिली मेम्बर्सच्या संबंधित उदा- वाढदिवस, विशेष दिन'' जसे- रौप्य–महोत्सव, षष्ठीपूर्ती, अमृत–महोत्सव, सहस्त्रचंद्र दर्शन'', या प्रसंगात प्रत्यक्ष हजर रहा, हेच ते प्रसंग असतात ''ज्यातून परिवारातील जुन्या–पिढीचे- नव्या पिढीशी स्नेहाच्या भावनांचे आनंदयक आदान–प्रदान होते''. व्हाटसपमधले मेसेज, स्माईली'', यांच्यापेक्षा समक्ष झालेल्या भेटीत, बोलण्यातून जो स्पर्श होतो तो मनात कायमचा ठसतो, या भेटीचे क्षण पुढे कित्येक दिवस मनाला मोठा आनंद देतात.

मित्र हो- अनुभूती येण्यासाठी अनुभव घ्यावा लागतो '' मग अनुभवाचा प्रकार व्यावहारिक असो की पारिवारिक, आपण एकमेकांशी जितके परिचित होऊत, तितका आपल्यात जिव्हाळा, आपुलकी, आपलेपणा अधिक दृढ होईल. एखाद्या लग्न–समारंभात, मौंजीच्या कार्यात, नव्या पिढीच्या नातवंडांना एकाच ठिकाणी खुप आबा आजी भेटतात'' हे आनंदाचे क्षण नवी पिढी मनात जपून ठेवते'', ही मी अनुभवलेली भावना'', तुम्ही पण अनुभवावी असे म्हणेन.



# इंदापूरी निखारे


## आत्महत्त्या...




**ज्योतिर्मय साहित्य**

एव्हढा मोठा अब्जाधीश व्यावसायिक...
आणि ३३ व्या मजल्यावरून आत्महत्त्या...
लोकांचा विश्वास बसे ना...
गाण्यामध्ये खूप वेळा ऐकले असेल...
दिलके तुकडे हुये हजार...
पार भावुक होऊन जातो...
पण प्रत्यक्षात जेव्हा पाहिले...
तेव्हा बहुतेक हदरून गेलेले...
आता एव्हढा मोठा आणि आत्महत्त्या...
म्हणून सगळीकडे धावपळ...
प्रतिष्ठित मंडळी, राजकीय, सामाजिक वगैरे वगैरे...
आणि पोलीस डिपार्टमेंट...
साधसुधा माणूस थोडाच होता...
कुठे रस्त्यावर बेवारस गेला...
अपघातात गेला... वृद्धाश्रमात गेला...
वय झाले म्हणून...
सोसायटी मध्ये एकटाच मरून गेला...
आणि वास यायला लागल्यावर कोणीतरी कळवले...
अगदी अब्जाधीश म्हणून गेला...
आत्महत्त्या केली होती...
स्वतःच्या आणि इतर अनेकांच्या दिलाचे...
हजार हजार तुकडे करून गेला...
त्यामुळे मेल्यानंतर पण खूप सन्मान मिळत होता...
असे खूप थोडे भाग्यवान असतात...
पोलिसांनी कसून चौकशी सुरु केली...
अशी काही घटना घडली की...
त्यांना वेठीस धरायचे असे ठरलेले आहे, असते...
आता आत्महत्त्या हा पण गुन्हा आहे...
याचा विचार वेठीस धरणाऱ्यांना बिलकुल नसतो...
तपास सुरु झालेला होताच...
आणि त्यांच्या लक्षात आले...
त्यांनी नुकतीच एक नवीन सेक्रेटरीला...
नोकरीला ठेवली होती...
बाकी सगळा स्टाफ विश्वासू आणि
अनेक वर्षांपासून काम करत होता...
त्यांनी सेक्रेटरीला ऑफिस मध्ये भेटायला बोलावले...
बाकीच्या काही लोकांना पण बोलावले होते...
एक सुंदर तरुणी... कमीत कमी कपडे घातलेली...
नुसते सुंदर तरुणी लिहिले...
तर डोळ्यासमोर कोणी येत नाही...
म्हणून कमीत कमी असे लिहिले...
कोणीतरी येईल असे समोर असे वाटते...
मराठी भाषा खूप अवघड आहे
असे म्हणतात बरेच जणं...
म्हणून हिंदी, इंग्लिश भाषा शिक्षण वगैरे वगैरे...
मराठी पण खूप छान आहे
असे जाणवून देण्याचा प्रयत्न...
आलिशान कार मधून बाहेर पडताच वातावरण...
जादूची कांडी फिरवली गेली...इतकेच नाही तर...
राम नाम सत्य आहे म्हणत...
ज्याला अंतिम यात्रेला घेऊन चालले होते...
तो काही क्षण जागा झाला...
नेत्रसूख घेण्यासाठी...
ती मोठ्या साहेबांच्या समोर...तिचे जोरदार स्वागत...
सगळे ज्युनियर... तिच्याकडे पहात...
साहेबांना जयहिंद सर म्हणून जात होते...
काय घेणार आपण... चहा, कॉफी, कोल्डड्रिंक...
का अजून काही? नको सर, काहीच नको...
आपण बोलावले आहे ना चौकशी साठी...
साहेब बोलायला सुरुवात करणार तेव्हढ्यात...
जयहिंद सर... चहा...
जयहिंद सर... कॉफी...
जयहिंद सर... ज्यूस...
जयहिंद सर... ब्रेड बटर...
जयहिंद जयहिंद जयहिंद...
नाश्त्याचे सर्व पदार्थ...
त्या मोठ्या साहेबांच्या टेबलवर...
डोहाळ जेवण असते त्याप्रमाणे...
साहेब म्हणतात...अरे हे काय चालले आहे?
इतक्या रागाने विचारतात की...
की तो ज्युनियर आनंदाने तिच्याकडे पहात पहात म्हणतो... सर, पोलिसांची भीती वाटू नये म्हणून...
निदान अशा काही लोकांना तरी...
साहेब तिला विचारतात... तू त्यांची सेक्रेटरी...
त्यांनी आत्महत्त्या केली...तेव्हा तू कोठे होती...
मी त्यांच्या बरोबर केबिन मध्येच होती...
मग नेमकं काय झाले?
तू तर नुकतीच जॉईन झाली होती...
ह सर... अगदी १५ दिवसच झाले होते...
नक्की काय झाले? काही प्रॉब्लेम झाला होता का?
तसा काहीच नसावा, खूपच छान व्यक्तिमत्व...
मी जॉईन झाले, एकदोन दिवसांनी त्यांनी...
मला डिझायनर ड्रेस दिला...२ लाख किंमत होती...अजून दोनतीन दिवसांनी...१५ लाख रुपयाचा हिऱ्यांचा हार दिला...अगदी दोनच दिवसापूर्वी त्यांनी ५ लाख रुपयाची हिऱ्याची अंगठी पण आणली होती...त्यादिवशी म्हणजे...त्यांनी उडी मारली त्यादिवशी...
त्यांनी माझ्या बोटामध्ये प्रेमाने अंगठी...
ही तीच अंगठी आहे सर...
त्यावेळी माझ्या वडिलांचा फोन आला...
मी वडिलांना फोनवर म्हणाले...बाबा तुम्ही इथे असता तर... तुम्हालाही समजले असते...
बॉस माझ्यावर किती प्रेम करतो...
आणि तुम्ही मला नेहमी म्हणत असता...
मुला...
तू मुलीचा वेष घेऊन फिरत जाऊ नको...
बहुतेक हे ऐकल्या मुळे...असू शकते...
खरं बोलता येत नाही...
खरं बोलणे ऐकू पण शकत नाही...
कोणीही...

# जात्यावरच्या ओव्या......



### नातेसंबंध : पती-पत्नी

माझ्या अंगणात
साळुंकी पंख झाडी
दूरच्या देशीची लेक
माझी निरूप धाडी ||७५||

दुरल्या देशीच
पत्र पडल येऊन
गवळण बाई
काय धाडले लिहून? ||७६||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# फुलमाला....



### आकाशनील (नील मोहर)

उन्हाळ्यात भरभरून फुलणाऱ्या
आकाश नील फुलांचा रंग असतो निळा जांभळा
हिरवीगार पाने आणि सुंदर घोसाने लागणाऱ्या
फुलांमुळे हा वृक्ष दिसतो खूप वेगळा,

हा शोभायमान फुलांचा वृक्ष शोभा वाढवतो
रस्त्याची आणि बागेची,
सुबक छान भांडी बनवली जातात
याच्या कातीव लाकडाची...

सौ.माधुरी म.इनामदार, मिरज.

# ग्रामीण साहित्य : आरंभ आणि परंपरा

ज्योतिर्मय साहित्य

ग्रामीण साहित्याची सुरुवात अगदी आदिकालातच झाली होती, जेव्हा ऋग्वेदातील पहिल्याच सूक्तात अग्नीची स्तुती केली गेली आहे. या आद्य साहित्याच्या पहिल्या मंत्रात अग्नीचे महत्त्व गायले गेले आहे. अग्नीचा हा पूजनीय भाव आजही प्रवाहीत आहे, कारण आजही शेतकरी सकाळी उठल्यावर सर्वप्रथम पूर्वेकडे पाहतो आणि सूर्यदेवाला नमस्कार करतो. या सूक्तात अग्नीला ''कवी'' असेही म्हटले गेले आहे. ऋग्वेदातीलच नासदीय सूक्तात सृष्टीच्या उत्पत्तीविषयी सांगितले आहे की सृष्टीच्या आधी काळोख आणि पाणी होते

''तम आसीत्तमसा गूहळम् अग्रे अप्रकेतकम् सलिलं सर्वमा इदम्।

तुच्छयेन आभु अपिहितम् यत् आसीत् तमसः तत् महिना अजायत् एकम्।।''

काळोखाच्या आधारे आकाश आणि पाण्याच्या आधारे पृथ्वी होती. या सूक्तात आधीच्या मंत्रांमध्ये प्रकाशाचाही उल्लेख आहे. याच दृष्टीने पाहता सृष्टीच्या सुरुवातीला पृथ्वी, अंधार, आकाश, पाणी आणि तेज हे घटक होते. कल्पना केली तर या घटकांच्या संयोगातून पृथ्वीवर अनेक वनस्पती उगवलेल्या असतील आणि त्या वेळी पहिल्यांदाच पृथ्वी डोलून हसली असेल जसे आजही उन्हाळ्यानंतरची पहिली पावसाची सर पृथ्वीला हसवते. ही हसरी आणि रूप बदललेली पृथ्वी पाहूनच अथर्ववेदातील ऋषींनी म्हटले असेल:

''यत् ते मध्यं पृथिवी यच्च नभ्यं यास्त ऊर्जस्तन्व संबभूवुः।

तासु नो धेह्यभि न पवस्व माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः।।''

हा मंत्र म्हणजे शेती, शेतकरी आणि पंचमहाभूत यांच्यातील नात्याची पहिली कविता आहे, जिथे पृथ्वीला माता, तर आभाळाला पिता संबोधले आहे. हीच ती कविता आहे जी जोतलेल्या जमिनीवर शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या नात्याचे सर्वोत्तम वर्णन करते.

जेव्हा पृथ्वीने पहिल्यांदा हसले, तेव्हा आदिमानवाने वनस्पतींचे पान, फुल, फळे पाहून जमिनीवर पडलेले बी पाहिले असेल. कधीतरी त्याने एखादे बी जमिनीत उगवताना पाहिले असेल आणि मग कधीतरी त्याने बी निवडून स्वतः जमीन जोतून ती बी रोवली असतील तोच झाला पृथ्वीचा पहिला शेतकरी. आणि तेव्हाच त्याने आकाशात पाहून पावसासाठी ढगांना अशी प्रार्थना केली असेल

''धरतीकडे तोंड वळवून कर पुकार
गर्भ धरव वनस्पतींमध्ये, भिजव पुन्हा जग साकार।
मेघगर्जनेतून परत एकदा,
पाण्याचा झरा उघड
ही धरती पाणी प्यावी
मनसोक्त,
जलात न्हाऊन, ही
तहानलेली सृष्टी पुन्हा जिवंत
व्हावी।''
(ऋग्वेद ५/८३)



डॉ.गोपाल शर्मा 'सहर'
कपडवंज अहमदाबाद
गुजरात

त्या आद्य शेतकऱ्याने राहण्यासाठी वनस्पतींच्या सहाय्याने घर उभारले असेल. तेच सृष्टीतील पहिले घर. हळूहळू तशाच प्रकारची अनेक घरे उभी राहिली आणि मग ते एक गाव झाले. तेव्हा त्या शेतकरी कुटुंबाने गाणे गायले असेल

''हे धरतीमाते, तुझ्या वरती,
आत आणि खाली
जे जे ऊर्जा स्त्रोत आहेत
तुझ्या शरीरात साचलेली
आम्हाला त्यांचं वरदान दे
आम्ही होऊ प्रकाशमय, पवित्र मनाने सतेजते।''
(अथर्ववेद १२.१)

सृष्टीचे ते पहिले गाव हळूहळू विकसित होत गेले आणि आजही आपण गावांचा बदलता चेहरा पाहतो. म्हणावे लागेल की त्या आद्य गावांमध्येच ''आह'' आणि ''वाह'' या मानवाच्या पहिल्या भावना उमटल्या ज्या पुढे जाऊन लोकसाहित्य झाल्या. हे अतिशयोक्ती नाही खरे तर पृथ्वीवर प्रथम ग्रामीण साहित्यच जन्माला आले.

सृष्टीवर प्रथम घर आले, मग गाव. शहर, महानगर ही संकल्पना नंतरच्या काळात आली. ग्रामीण जीवनाचा मुख्य आधार शेती आहे. अन्न शेतीतून मिळते आणि अन्नामुळेच जीवन चालते. त्यामुळे खरं तर सृष्टीला चालवणारे गावच आहेत. औद्योगीकरणानंतर जागतिकीकरण, उदारीकरण, भूमंडलीकरण यांमुळे जीवनशैली आणि वस्तू इतक्या बदलल्या आहेत की कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात काही आठवड्यांतच एखादी नवी गोष्ट जुनी ठरते. या साऱ्या प्रक्रियांचा परिणाम फक्त शहरांवरच नव्हे तर गावांवर आणि आपल्या नात्यांवरही झाला आहे.

बाजार आपल्याला सुविधा देऊ शकतो, पण जीवनासाठी आवश्यक अन्न गावातील शेतकरीच निर्माण करतो. शहराचे झगमगते जीवन फक्त वरवरचा आभास आहे खरे पोषण गावच देते. गावातील लोकच शहरातील कारखान्यांमध्ये काम करतात. शहर म्हणजे सिमेंट आणि काँक्रीटची जंगलं. विज्ञानाच्या सहाय्याने जर वेगवेगळ्या वनस्पतींची बिया विखुरल्या, तर त्या केवळ माती असलेल्या जागीच उगम पावतील ही जागा गावांमध्येच आहे.

ग्रामीण साहित्य म्हणजे असे साहित्य ज्या साहित्यात गाव रचलेला-बसलेला असतो त्यातील आनंद, दुःख, अभाव, सण, समस्या, उत्सव यांचे वर्णन असते. संस्कृत साहित्य, कथा, नाटकांपासून ते सुभाषितांपर्यंत ग्रामीण जीवनाचे चित्रण आहे.

उदाहरणार्थ, एक वृद्ध बैल कोसळल्यावर त्याला उभे करण्यासाठी सर्व कुटुंबजण धावून येतात

''दोन्ही शिंगे धरले आहेत गृहस्थ आणि त्याचा मुलगा
आई-वडील उभे दोन्ही बाजूने आधार देत
गृहिणीने धरले आहे शेपूट, मुलं धरून आहेत खुर
सून त्याच्या गळ्याची घंटा सांभाळते आहे
हा एक वृद्ध बैल घरातील सर्वस्व
आणि आता पूर्ण कुटुंब त्याला उभे करण्यासाठी
अश्रूंनी धाय मोकलून टाकते !''

साहित्य परंपरेमध्ये बऱ्याच प्रमाणात ग्रामीण साहित्य निर्माण झाले आहे. यात गावकऱ्यांचे दुःख, अडचणी आणि आनंद व्यक्त होतो. एक उदाहरण :

''भुकेले मुलं मृत शरीरासारखी स्थिती
उरलेले नातेवाईक उपेक्षा करणारे
फाटलेली मडकी पाटीने जोडलेली
हे सगळं मनाला कमी दुःख देतं
पण पत्नीचं दररोज शेजारीनकडून सुई मागणं
आणि त्यासाठी तिने केलेली कुरकुर हे मनाला
खूप खोलवर लागते''

नवीन धान्य आल्यावर सणासारखा उत्साह

''घराच्या अंगणात नवे धान्य
संपूर्ण घर सुगंधित
मूसळ उचलून, बायका
कंगण वाजवत
धान्य कुटायला लागल्या
काही दिवसांचा सण, आनंद, उत्सव !''

भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात आणि नंतर ग्रामीण साहित्य हे केंद्रस्थानी होते. हिंदीत प्रेमचंद, रेणु, निराला, नागार्जुन यांच्या ग्रामीण जीवनावर आधारित अजरामर साहित्यकृती प्रसिद्ध आहेत.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याची सुरुवात महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' पासून झाली. त्यांच्या 'कुळंबीन' या कवितेने खूपच खळबळ माजवली होती. संत तुकाराम हे तर शेतकऱ्यांचे संत होते. कृष्णराव भालेकर यांचे 'बळीबा पाटील' प्रसिद्ध झाली.कोसला ही भालचंद्र नेमाडे यांची ग्रामीण कलाकृती गाजली.

गुजराती, कन्नड, पंजाबी, राजस्थानी अशा सर्व भारतीय भाषांमध्येही ग्रामीण साहित्य सशक्त आहे. भारतातील ७०७५% जनता गावात राहते. गुजरातीतील पन्नालाल पटेल, उमाशंकर जोशी, मणीलाल देसाई यांचे साहित्य ग्रामीण आयुष्याचे चित्रण करते. पन्नालाल पटेल यांची 'मानवीनी भवाई' आणि 'मळेला जीव' या कादंबऱ्या अमर ठरल्या आहेत.

हिंदीतील काही अमर कवितांचे उल्लेख

सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' यांची 'वह तोड़ती पत्थर' ही कविता स्त्री मजुराच्या आयुष्याचे सजीव चित्रण करते.

बाबा नागार्जुन यांची 'अकाल और उसके बाद' ही कविता अन्नाच्या टंचाईची भीषणता दाखवते

''कई दिनों तक चूल्हा रोया''

पंजाबी कवी अवतार सिंगची ही कविता आजही मन हेलावणारी आहे

''सर्वात धोकादायक असतं
आपल्या स्वप्नांचं मरण
घरातून बाहेर पडणं,
कामावर जाणं
आणि परत येणं
पण काहीही न जाणवणं
हीच खरी शोकांतिका असते!''

समारोप : गाव म्हणजे आपल्या संस्कृतीची उगमभूमी आहे. औद्योगिकीकरणानंतर गावांमधून युवकांचे जो पलायन सुरू झाले ते अजूनही थांबलेला नाही. शहरांनी अनेक तरुणांना गिळंकृत केलं. आता सीमेंटच्या जंगलांनी शेतजमीन झाकली आहे. पण तो दिवस लांब नाही, जेव्हा या इमारती पाडून पुन्हा शेतं तयार करावे लागतील.शहरातही जमीन असते आणि गावातही. पण गावातील शेतकऱ्याचं नातं मातीशी असतं, तर शहरी बिल्डरचं नातं केवळ नफ्याशी.

ग्रामीण साहित्य इत्रसुगंधाने नव्हे, तर मेहनतीच्या घामाच्या खाऱ्या वासाने भरलेले असते.

प्रेमचंद म्हणतात ''तुम्ही फावडे चालवता, मी लेखणी चालवतो पण मीही एक शेतकरी आहे !

(उद्घाटनाचे भाषण २४ वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलन कोल्हापूर)

***

# 'निसर्ग आणि सहजीवन' विवाह विच्छेदाचं उच्चाटन

ज्योतिर्मय साहित्य

जागतिक पर्यावरण दिनी ज्याप्रमाणे आपण वृक्षावरोपण तसेच लहान रोपांची लागवड करुन आपल्या परिसरात पर्यावरणाचे संवर्धन करतो, त्याचप्रमाणे आपल्या सभोवतालच्या प्राणीमात्रांचे, पक्ष्यांचे दाणे, पाणी, चारा देऊन त्यांचे संगोपन करत असतो. आपणही सर्व मनुष्यप्राणी, ह्या निसर्गाचा एक घटक आहोत. सर्व प्राणीमात्रांपेक्षा सर्वश्रेष्ठ अशी बुद्धिमत्ता देवाने माणसाला बहाल केली आहे, तरीही आपण माणसं आपल्या परस्परांतील नातं टिकवण्यासाठी, त्या नात्याला नव्यानं खतपाणी घालून त्याचं संवर्धन करण्यासाठी काही प्रयत्न करतो कां? कोणत्याही नात्याला नवसंजीवनी मिळते ती सकारात्मक विचाराने, सद् भावनेच्या सिंचनाने व प्रेमपूर्वक स्विकाराने. आपण डोळसपणे ह्या सृष्टीकडे पाहिलं तर उमजेल की, आपण माणसं बुध्दी असूनही विचारपूर्वक न वागता, माणसा-माणसातल्या नात्याला दुरावतोय. आज आपल्या समाजाला कुटुंब व्यवस्था टिकवून सामाजिक स्वास्थ्य जोपासण्याची नितांत आवश्यकता आहे.

आजच्या 'यूज-अँड-थ्रो'च्या युगात नातंही किती सहजपणे झिडकारलं जातंय. घटस्फोटाची वाढती संख्या व कोलमडणारी कुटुंब व्यवस्था पाहिली की वाटतं, नव्यानं ह्या नात्याकडे व सहजीवनाशी संबंधित अन्य नात्यांकडे तसेच जगाशी जोडल्या जाणार्या इतर भावनिक नातेसंबंधांकडे निसर्गाच्या दृष्टीने पाहिलं तर आपण माणसंही एकमेकांची शक्ति बनू शकतो.

एकमेकांची एकजूट दर्शविणारा मेंढ्यांचा, गाई-गुरांचा कळप, आकाशात एकमेकांच्या साथीने विहार करणार्या पक्ष्यांचा थवा, फुलांचे ताटवे, बहरलेले वृक्ष, टवटवीत दिसणार्या वेली, जलाशयातील आगळंवेगळं नेत्रसुख देणारे विविधरंगी जलचर प्राणी. हे सारे त्यांच्या विभिन्नतेतूनही एकता दाखवतात. परस्परांच्या विश्वात दखल न देताही एकमेकांना पूरक राहून निसर्गाचा समतोल सांभाळतात.

निसर्ग नियमानुसार मनुष्याची वाढ, ऋतुमानाप्रमाणे होणारे बदल, सूर्याचे धरतीला प्रकाशमान करण्याचे, पावसाने न्हाऊन चिंब करण्याचे व हवेचे वहन करण्याचे कार्य युगानुयुगे अविरत चालू आहे. मानवाने आपल्या प्रगल्भ बुद्धिमत्तेने, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने क्रांती केली; संगणक युगात वेगवेगळ्या प्रसार माध्यमांनी जरी जग जोडलं गेलं असलं, तरी प्रत्यक्षात मात्र माणसांची नाती व प्रत्यक्ष भेटी-गाठी दुरावल्या आहेत.

वर्तमानपत्रातल्या अत्याचाराच्या, अमानवी कृत्यांच्या, नात्यांची चिरफाड करणार्या बातम्या वाचल्या की मन विषण्ण होतं. देवाने आपल्याला दोन हात दिले आहेत, ते सत्कर्म करण्यासाठी, परस्परांना साथ देण्यासाठी आणि आपल्या वाणीचा उपयोग सुसंवादाने जगाशी नाते जोडून, एकमेकांत आपुलकी वाढवण्यासाठी. अविचारी माणसं आपली अर्धी अधिक उर्जा ही वायफळ गोष्टींवर चर्चा करण्यात, दुसर्यांवर टिका करण्यात, वाद-विवादात व दुष्कृत्य करण्यात वापरून, स्वतःची आणि पर्यायाने समाजाची हानी करुन घेत आहेत. वैवाहिक जीवनात जोडीदारांनी आपले 'इगो' जपण्यासाठी टोकाची भूमिका घेतल्यामुळे कौटुंबिक घडी विस्कळीत झाली आहे. भाऊबंदकीत व इतरही नात्यांत संपत्ती, जमीन-जुमला व पैशावरून तंटे व वादविवाद सुरुच असतात व ते न्यायालयात पिढ्या न पिढ्या चालू राहतात.

गंमत म्हणजे मूक पशू-पक्ष्यांच्या विश्वात केवळ चोच, पंख व पायांच्या बळावर, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या आधारे त्यांचे नित्य व्यवहार पैशाशिवायही सुरळीत सुरु असतात. तेही आनंदाने जगाला प्रसन्नता, सुंदरता बहाल करत असतात आणि विशेष म्हणजे त्यांच्या जगात कोणतेही 'घोटाळे' न करता ! म्हणूनच की काय, आपल्याला कोणताही प्राणी, पक्षी, फुले-पाने सजीव असूनही माणसांप्रमाणे दुःखी व तणावपूर्ण दिसत नाहीत. चिखलात राहूनही न कुरकुरता कमळ सौंदर्याने खुलते. काट्यांमध्ये राहूनही गुलाब प्रसन्नतेने फुलतो. आपण माणसं मात्र आपल्या दुःखांचा केवढा बाऊ करतो. दुसर्यांकडून अवाजवी अपेक्षा ठेवल्यामुळे आपण दुःखालाच कवटाळून बसतो. म्हणूनच आपल्याला सुख जवाएवढे व दुःख पर्वताएवढे दिसते.



निसर्गप्रेमी
अॅड. सुजाता त्रिंबककर टिपणीस
वसई, जिल्हा पालघर

निर्मळ निसर्ग, निरपेक्ष प्रेम व समाधान देणारे पशु-पक्षी पाहिले की वाटतं, भौतिक सुखाच्या मागे धावणार्या, यंत्र-सामुग्रीसह जीवन व्यतीत करणार्या, प्रसार माध्यमांच्या व डिजिटल गॅजेट्सच्या मोहजालात अडकणार्या माणसा, भरभरुन देणार्या या निसर्गाकडे डोळसपणे पाहून घटकाभर श्वास घे! निसर्गाच्या हिरव्या कुशीत विसावा घे, खळखळ वाहणार्या पाण्यात, निर्झर झर्यात, कोसळणार्या धबधब्यांत स्वतःला झोकून दे! रंगीबेरंगी फुलपाखरांकडे नुसतं कुतूहलाने पाहिलं तरी मनाला प्रसन्न वाटतं. 'मन पाखरू पाखरू' खुणावत आपल्यालाही त्यांच्यासारखं क्षणांत आकाशी उडणारी अन् क्षणांत भुईवर परतून येणारी, इकडे-तिकडे भिरभिरणारी फुलपाखरे वेगळाच आनंद देतात. ही पाखरं जणू आपल्याला त्यांच्यासारखं मन हलकं-फुलकं, ताजं-तवानं ठेवण्याचा संदेश देतात.

जीवन सुखी, समाधानी व सुसह्य करण्याचा कानमंत्र ऐकायचा आणि अनुभवायचा आहे कां? पशु-पक्ष्यांच्या रमणीय जगतातील दाखले ऐकत, निसर्गात रममाण करणारा, त्याचं आपल्या सहजीवनाशी महत्व सांगणारा, मनमोराचा पिसारा फुलविणारा हा कार्यक्रम तुम्हाला नक्की आवडेल.

निसर्ग देवतेचे स्मरण करून, भूमातेला वंदन करुन, समस्त वाचकांसाठी मी माझं उर्वरित मनोगत माझ्या 'निसर्ग आणि सहजीवन' ह्या कार्यक्रमात मांडते. त्यासाठी तुमच्या मंडळातर्फे, सार्वजनिक संस्थेतर्फे, बचत गट-युवक-युवती गटातर्फे मला खालील मोबाईल (व्हॉट्स अप) क्रमांकावर संपर्क साधावा.

'निसर्ग आणि सहजीवन'
निसर्गाप्रमाणेच मन प्रसन्न करणारा,
सकारात्मक विचार देणारा,
सहजीवनावरील कवितांचा निखळ
आनंद देणारा,
एक आगळा वेगळा अभिवाचन
व सुसंवादाचा कार्यक्रम!
वैवाहिक जीवन समृद्ध करणारे
सादरीकरण !
'घटस्फोट टाळा, विवाह वाचवा'



# एक गंधाळलेली संध्याकाळ....




Lake Ontario (गोड पाण्याचा तलाव)... हा तलाव बघण्याची मला इथे आल्यापासून खूप तीव्र इच्छा होती. पूर्ण देशाला गोड पाणी पुरवणारा हा तलाव किती मोठा असेल कसा असेल हे जाणून घ्यावेसे वाटायचे. अमेरिकेचा थोडा भाग आणि आणि खूप मोठा कॅनडाचा भाग या मध्ये हा तलाव समुद्रासारखा पसरलेला मी नकाशामध्ये पाहिला आणि त्याला पाहण्याची उत्सुकता आणखीनच वाढली. माझ्या लेकीचे घर मध्यवर्ती आहे. आजपर्यंत जिथे जिथे आम्ही गेलो साधारण एक दीड तासांमध्ये सहज पोहोचू शकतो इतके अंतर होते. अशाच एका संध्याकाळी आम्ही इथे जाण्यासाठी निघालो.

नेहमीसारखा दुतर्फा हिरव्यागार झाडातून जाणारा सुंदर नागमोडी सळसळीत रस्ता. मध्ये मध्ये झाडातून डोकावणारे अतिशय सुंदर बांधणीचे सुबक बंगले. आणि सुमधुर गाणी. असा हा प्रवास खूप आनंद देणारा असतो. साधारण अर्ध्या पाऊण तासात आम्ही तिथे पोहोचलो.

गाडी पार्क करून आम्ही तलावाकडे निघालो. सगळीकडे पसरलेले हिरव्या गार गवताचे गालिचे आणि वेगवेगळी उंच झाडे. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी आलेले अनेक लोक.. तरीही वातावरणात भरून राहिलेली एक निरव शांतता आणि सुखद गारवा. हे सगळे अनुभवताना एक प्रकारची ऊर्जा येते..

मध्येच वाळूवर झोपाळे, घसरगुंड्या असे लहान मुलांचे अनेक खेळ होते. नाती बरोबर झोपाळ्यावर बसून, घसरगुंडी वरून घसरून माझा हरवलेला बालपणातील निरागस आनंद अलगद झेलला.

तिथून आम्हीं तलावाकडे गेलो. क्षितिजापर्यंत पसरलेले अथांग शांत निळसर स्वच्छ पाणी. त्याच्या काठावर येणाऱ्या छोट्या छोट्या लाटा. कडेला पसरलेली मऊ मऊ रेती पावलांना सुखावत होती. निळे भोर आकाश पांढऱ्या ढगांची नक्षी लेऊन... सूर्य किरणांची सोनेरी शाल पांघरल्यासारखे अतिशय छान दिसत होते. त्याचे ते सुंदर प्रतिबिंब स्वच्छ पाण्यात तरंगत होते. मध्येच उडणाऱ्या सीगल पक्षांचे पंख उधळत्या सोन रंगात चकाकत होते.. आणि सगळ्यात कौतुकाची गोष्ट म्हणजे. डौलदार मानेचे अनेक शुभ्र राजहंस तलावात पोहत होते. मनाच्या गहराई पर्यंत सहज पोचणारा आणि निःशब्द करणारा असा नजारा मी आजपर्यंत बघितला नव्हता...

इतके सुंदर निसर्ग सौंदर्य. आणि एवढा छान शीतल पाण्याचा अथांग तलाव स्वच्छ ठेवणाऱ्या इथल्या नागरिकांचे मला मनापासून खूप कौतुक वाटते. इथे कुठल्याही प्रकारचे औद्योगीकरण त्यांनी करून दिलेले नाही. तलावामध्ये खाजगी बोटी फिरत होत्या. पण व्यावसायिक बोट नव्हती.जे समूहा समूहाने लोक येतात ते घरातून छोटा फ्रिज, बार्बीक्यू, खाण्याच्या वस्तू, फोल्डिंगच्या खुर्च्या ,खेळ जे हवे ते घेऊन येतात. आपल्याला हवे ते खातात, खेळतात आणि आपला सगळा पसारा स्वच्छ आवरून घेऊन जातात. तसेच इथे कुठेही भेळेच्या, पाणीपुरी इत्यादीच्या गाड्या नाहीत त्यामुळे केर कचरा कुठेच नाही. दूरवर एक फिरती आईस्क्रीमची गाडी तेवढी होती. त्यातूनही कुठे कचरा झालाच तर टाकण्यासाठी डस्टबिन ठेवले होते. हे मला कौतुकास्पद वाटले. तसेच ते पाण्यात काहीही टाकत नाहीत. शांत पणे काठावर बसून हे सौंदर्य न्याहाळत होते.काहीजण आमच्या सारखे पाण्यातील लाटांचा अनुभव घेत होते..

आम्हीं खूप वेळ त्या थंडगार पाण्याच्या नितळ लाटांचा नितळ स्पर्श अनुभवला. काठापर्यंत सहज येणारे राजहंस बघितले, त्यांचे विलोभनीय पोहणे बघितले. दूरवर पसरलेली ती अथांग निळाई डोळ्यात साठवत, गंधाळलेल्या संध्याकाळचा गंध मनात भरून घेत त्या दिवसाचा निरोप घेतला...

# 'चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान' या मालिकेतून पद्मिनी कोल्हापुरे टेलिव्हिजनवर राजमातेच्या रूपात पुनरागमन करणार

ज्योतिर्मय साहित्य

'चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान' या आपल्या आगामी ऐतिहासिक मालिकेतून सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजन पराक्रम, नेतृत्व आणि शूर वारशाची कहाणी प्रेक्षकांसमोर मांडणार आहे. या भव्य मालिकेत पृथ्वीराज चौहान राजाची एका युवा, भाबड्या राजकुमारापासून ते भारतातील एक महान योद्धा राजा बनण्याच्या प्रवासाची कहाणी उलगडणार आहे. या मालिकेत त्याची युवावस्था, त्याचा संघर्ष, त्याने मिळवलेले विजय आणि त्यातून आकाराला आलेला एक महान शासनकर्ता असा एक दिव्य प्रवास प्रेक्षक बघतील.

या मालिकेच्या राजेशाही थाटाला साजेशा राजमातेच्या शालीन भूमिकेत ज्येष्ठ अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे दिसणार आहे. परंपरा आणि नवतेशी जुळवून घेण्याची वृत्ती यांचा समतोल सांभाळत, आपल्या अढळ प्रेमाने आणि सूक्ष्मदृष्टीने ती भावी राजाला मार्गदर्शन देते. तिच्या उपस्थितीतच राज्याचा आत्मा आहे. आपल्या शांत दृढतेने आणि सखोल प्रभावाने तिने साम्राज्य जोडून ठेवले आहे. टेलिव्हिजनवर पुनरागमन करण्याबाबत आणि आपल्या भूमिकेविषयी बोलताना पद्मिनी कोल्हापुरे म्हणते, '''चक्रवर्ती सम्राट पृथ्वीराज चौहान' मालिकेच्या विश्वास पाऊल ठेवणे माझ्यासाठी खूप विशेष गोष्ट आहे- केवळ मी एक दमदार भूमिका करत असल्यामुळेच नाही, तर जवळजवळ ११ वर्षांनंतर मी टेलिव्हिजनवर परतत आहे म्हणून. टेलिव्हिजनवरील माझ्या प्रवासाची सुरुवात सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनपासूनच झाली होती. आणि आता इतक्या वर्षांनी, या आव्हानात्मक आणि समाधान देणाऱ्या भूमिकेद्वारे मी पुन्हा त्याच वाहिनीवर परतत आहे. ही भूमिका जेव्हा मला देऊ करण्यात आली, तेव्हा राजमातेची व्यक्तिरेखा मला तात्काळ आपलीशी वाटली. इतकी सखोलता, ग्रेस आणि शांततेची ताकद दाखवणारी भूमिका क्वचितच करायला मिळते. ती केवळ एक राणी किंवा माता नाही- ती या राज्याचा आत्मा आहे. राजमाताची भूमिका करताना पडद्याच्या मागे राहून शांतपणे इतिहासाला आकार देणाऱ्या त्या सर्व खंबीर महिलांना आदारांजली वाहत असल्याची भावना मनात येते. तिचे पृथ्वीराजशी सुंदर नाते आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559